Maharashtra State
Board of
Secondary & Higher
Secondary Education,
Kolhapur Divisional Board
Kolhapur - 416004

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - 416 004

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com


क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/124
दिनांक:- 09 JAN 2026

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा,
सातारा/ सांगली / कोल्हापूर.

विषय:- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) मार्च 2026 परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांच्या शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव ऑनलाईन सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ:- 1. शासन निर्णय क्र.संकीर्ण 2016/ प्र.क्र.202/एस.डी. -2, दिनांक 24.11.20217.
2. क्र.कशिमं/शारेप/सहा/2025/1300,दि.04.12.25 चे पत्र.
3. क्र.रा.मं/परीक्षा-7/4610, दिनांक 24.12.2025.

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक यांना कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. 10 वी) मार्च 2026 परीक्षेकरिता संदर्भ कमांक 1 च्या शासन निर्णयानुसार शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतची कार्यवाही मंडळामार्फत करण्यात येते.

सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र.5 मध्ये याबाबतचे प्रस्ताव विद्यार्थ्यांनी शाळेकडे दिनांक 15 **डिसेंबर** अखेर व माध्यमिक शाळांनी संबंधित विभागीय मंडळाकडे सदरचे प्रस्ताव सादर करावयाची अंतिम तारीख **15 जानेवारी** अशी नमुद आहे.

तथापि, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या पत्रान्वये शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिडीएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा 2025 चा निकाल जानेवारी 2026 च्या शेवटच्या आठवड्यात जाहीर करण्यात येणार असल्याने शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव शाळांनी विभागीय मंडळाकडे सादर करण्यासाठी खालीलप्रमाणे मुदतवाढ या वर्षापूरतीच देण्यात येत आहे.

| अ. क्र | तपशील | शासन निर्णयानुसार अंतिम दिनांक | वाढीव मुदतीसह सुधारीत अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | शाळांनी विभागीय मंडळाकडे ऑनलाईन प्रस्ताव सादर करणे | **15 जानेवारी 2026** | **31 जानेवारी 2026** |

उपरोक्त बाबींची सर्व माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांनी नोंद घेवून परिपूर्ण प्रस्ताव विहित मुदतीत या कार्यालयास ऑनलाईन सादर करावेत. कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही. याची दक्षता घ्यावी.

Digitally signed by
Subhash Rajaram Chougule
Date: 08-01-2026 15:16:29
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहितीस्तव-
शिक्षणाधिकारी,(माध्यमिक)- सातारा, सांगली व कोल्हापूर.

ACK